पावसात, वादळात झाडं पडतात तेव्हा
मनांत आलं......

**बिच्चारी झाडं!**

नाही छत्री, नाही आडोसा,
सावरायचा कसा, त्यांनी हा पसारा?
बिच्चारी झाडं!

पावसांनी झोडपले, चिंब चिंब केले,
मिटून घेतली पानं, आणि निमूट सहन केले!
बिच्चारी झाडं!

वाऱ्यानी झुलवले, भोवळ येईपर्यंत घुमवले,
मोडून पडले अवयव, पण हूं का चूं नाही केले!
बिच्चारी झाडं!

पूर्व सूचना मिळाली तरी,
झाडं काय करणार होती?
बिच्चारी झाडं!

माणसं मात्र घरात राहिली,
भजी, वडे खाऊन सुस्तावली,
बिच्चारी झाडं!

वादळ संपल्यावर, धडपडून उठतील
एकटीच जगण्याची धडपड परत करतील !
बिच्चारी झाडं!

**चित्रा मेहेंदळे...**